# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### मंडणगड तालुक्यातील (जि.रत्नागिरी ) शिरगांव येथील मिनी एमआयडीसी प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(१) ३३२६१ (१२-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) शिरगांव येथील मिनी एमआयडीसी प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी खाजगी संस्थेने मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मिनी एमआयडीसीचा प्रकल्प जिल्हाधिका-यांकडे वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या क्र. आयडीसी- २१९०/(१५२४६)/ उ.-१४, दिनांक १५.१०.१९९० अन्वये मौजे शिरगांव, ता.मंडणगड, जि.रत्नागिरी येथील लघु ओद्योगिक क्षेत्राकरीता, १५.२५.५ हे.आर क्षेत्र, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या प्रकरण ६ ची अधिसूचना दि. ०८.११.१९९० रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती.

सहकारी ओद्योगिक वसाहतींना प्रोत्साहन देण्याबाबत शासनाचे धोरण असल्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अन्वये अधिसूचित झाली आहे परंतु जमिनीचा ताबा घेतलेला नाही अशा ठिकाणी सहकारी औद्योगिक वसाहतींचे प्रस्ताव आल्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमांतर्गत होणारी कार्यवाही रद्द करण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरचे क्षेत्र सोवेली पंचक्रोशी सहकारी ओद्योगिक वसाहती करीता दि. १२.१०.१९९५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे विनाअधिसूचित करण्यात आले आहे. त्यामुळे मंडणगड तालूक्यामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची सद्यस्थितीत औद्योगिक वसाहत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

### कौंडगाव (जि. उस्मानाबाद) येथील एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रात टेक्निकल टॅक्सटाईलचे इंडस्ट्रिल हब करण्याबाबत

**(२) ३३७०७ (१२-०१-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौंडगाव (जि. उस्मानाबाद) येथील एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रात टेक्निकल टेक्सटाईल हब करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. २० ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्हा हा निती आयोगाने देशातील निवडलेल्या ११५ अंकाक्षित जिल्ह्यापैकी एक जिल्हा आहे, हे खरे आहे काय तसेच उस्मानाबाद जिल्हयातील पर्जन्यमान राज्यातील इतर जिल्हयापेक्षा कमी असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कौंडगाव, येथील एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रात एकूण २४०० एकर जमिनीपैकी १४०० एकर जमिनीचे संपादन झालेले असून उर्वरित १००० एकरचे संपादन अंतिम टप्प्यात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, औद्योगिक क्षेत्रात लवकरच टेक्नीकल टेक्सस्टाईल इंडस्ट्रिज हब सुरु करण्याची घोषणा उद्योग मंत्री यांनी औरंगाबाद येथे केली होती, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कौंडगाव, येथील औद्योगिक क्षेत्रातील टेक्नीकल टेक्सटाईल इंडस्ट्रिज हब सुरु करण्याबाबत शासन कोणती उपाय योजना करित आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

कौडगांव औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. १ साठी १७३.७४ हेक्टर आर (४२९.१३ एकर) व कौडगांव औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. ३ साठी ३७३.७४ हेक्टर आर (९२३.१३ एकर) असे एकुण १३५२.२६ एकर क्षेत्र महामंडळासाठी संपादित झालेले आहे. उर्वरित ११.०९ हे. आर भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.

कौडगांव औ. क्षे. टप्पा क्र. १ मधील १७३.७४ हे. आर क्षेत्राचा ताबा महामंडळास प्राप्त झाला असून सदर औद्योगिक क्षेत्राचा आराखडा तयार करण्यात आला आहे. ११८.०० हे. आर क्षेत्र मे. महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मीती कंपनी यांना सौरऊर्जा विद्युत निर्मिती करीता, ३६.०० हे. आर क्षेत्र प्रकल्पग्रस्ताकरिता तसेच २.०० हे. आर क्षेत्र महामंडळाकरीता राखीव ठेवण्यात आले आहे.

कौडगांव औ. क्षेत्र टप्पा क्र. ३ मधील ३७३.३१ हे. आर क्षेत्राचा ताबा महामंडळास प्राप्त झाला असून विकास नियमावलीनुसार २३१.३१ हे. आर क्षेत्रावर भूखंड पाडण्यात आले आहेत.
(४) व (५) उस्मानाबाद येथे टेक्निकल टेक्सटाईल पार्क स्थापन करण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून प्राथमिक व्यवहार्यतेबाबत (Macro level Feasibility) पडताळणी करण्यात आली आहे. तसेच सदर ठिकाणी टेक्निकल टेक्सटाईल पार्क स्थापन करण्याबाबत तांत्रिक- व्यवहार्यतेबाबत अहवाल तयार करण्याची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेल्या जमिन खरेदी प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी करण्याबाबत

**(३) ३३७५९ (१२-०१-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेल्या जमिन खरेदी प्रकरणाची उच्च स्तरीय ठाणे जिल्हयातील कसारा येथून जवळच असलेलया खर्डी हद्दीत चौकशी करण्याची मागणी एका राजकीय संघटनेने माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या सुमारास केंद्रीय मा. वन आणि मा. पर्यावरण मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी राज्य शासना कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :** (१) राजकीय संघटनेने माहे ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या सुमारास केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्री यांना दिलेले लेखी निवेदन अद्याप पर्यंत शासनास प्राप्त झालेले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तालुका नांदुरा (जिल्हा बुलढाणा ) येथे नवीन औद्योगिक विकास क्षेत्र (एम.आय. डी .सी) मंजूर करणेबाबत.**

**(४) ३५१५८ (१२-०१-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा मलकापुर (जि. बुलढाणा) या राष्ट्रीय महामार्गवर वसलेल्या रेल्वेची सुविधा तसेच मोठ्या प्रमाणात शासकीय जमीन उपलब्ध असलेल्या व तालुका मुख्यालय असलेल्या नांदुरा शहरात एम.आय.डी.सी. मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक २२ मार्च , २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपापयोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नांदुरा तालुक्यातील मौजे महाळूंगी येथील ५७.२० हे.आर सरकारी जमीन सलग नसून विखुरलेली आहे, तर मौजे माळेगांव येथील ४१.४२ हे.आर सरकारी जमिनीपैकी २६.७० हे.आर जमीन सलग आहे मात्र त्यास पोहोच रस्ता उपलब्ध नाही. मौजे सांगवा,बडी,अंबाडा येथील सरकारी जमीनीचे क्षेत्रफळ खूपच अल्प व विखुरलेले आहे.मौजे कोलासर येथील सरकारी जागेवर तलाव बांधण्यात आला आहे. सदर ठिकाणी औद्योगिक क्षेत्र स्थापन करता येणे शक्य नसल्यामुळे नांदूरा तालुक्यातील सरकारी तसेच खाजगी सुसाध्य जागेची पडताळणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तालुका मलकापूर (जि. बुलढाणा ) टेक्स्टाईल पार्क मंजूर करणे बाबत**

**(५) ३५१६४ (१२-०१-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता. मलकापूर (जि. बुलढाणा ) येथील कापुस पिकाचा २० हजार हेक्टर क्षेत्रात होणारा पेरा होऊन, ३,३०,२५० क्विंटल होणारे उत्पन्न लक्षात घेऊन मलकापूर येथे टेक्स्टाईल पार्क मंजूर करणे बाबतची विनंती मा. मुख्यमंत्री यांना मलकापूर येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे दिनांक २२ मार्च २०२१, रोजी अथवा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे का,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) मलकापूर औद्योगिक क्षेत्राकरीता सन १९८६ मध्ये म.औ.वि.महामंडळाने एकूण २०३.३९ हे.आर क्षेत्र औद्योगिक विकासाकरीता संपादीत केले असून सदरहू औद्योगिक क्षेत्रामध्ये २३९ भूखंडांचे आरेखन करण्यात आलेले आहे.या औद्योगिक क्षेत्रामध्ये मे.बिर्ला कॉटसिन यांना सर्वात मोठा भूखंड वस्त्रोद्योगाकरीता वाटप करण्यात आलेला आहे.तथापि सदरचा उद्योग सद्यस्थितीत बंद आहे.सदर औद्योगिक क्षेत्रात ५६ भूखंड आजमितीस रिक्त आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे शहरातील वनविभागाची आरक्षित जमीन एमआयडीसीला हस्तांतरित करणे बाबत**

**(६) ३५७१९ (१२-०१-२०२२). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथे एम आय डी सी कार्यरत असून मागील अनेक वर्षांपासून औद्योगिक क्षेत्रातील जवळपास सर्वच प्लॉट

आवंटित झाले असून होतकरू बेरोजगार युवकांना त्यांचे उद्योग उभारण्यासाठी या औद्योगिक क्षेत्रात जागा शिल्लक नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धुळे शहराची वाढती लोकसंख्या, बेरोजगार युवकांचा उद्योग उभारण्याकडे असलेला कल व औद्योगिक क्षेत्रातील जागा मिळावी यासाठी वाढती मागणी आणि सध्याचे असलेले मर्यादित औद्योगिक क्षेत्र या सर्व बाबींचा ताळमेळ विचारात घेऊन स्थानिक लोकप्रतिनिधींनी वनविभागाची आरक्षित जमीन एमआयडीसीकडे हस्तांतरित करण्याची मागणी शासनाकडे केली होती, हे ही देखील खरे आहे काय,
३) असल्यास, वनविभागाच्या आरक्षित जमिनीपैकी काही एकर जमीन एमआयडीसीला हस्तांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :** (१),(२) व (३) हे खरे आहे.

अति. धुळे औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे रावेर, ता.जि. धुळे येथील विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडील गट नं. ८०/अ पैकी २९०.६९ हे. आर. क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव महामंडळामार्फत वन विभागास सादर केला आहे. सदर क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे वर्ग झाल्यानंतर सदर ठिकाणी औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामीण भागातील औद्योगिक वसाहती मधील भूखंड रिक्त असण्याबाबत

**(७) ३५७२५ (१२-०१-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धामणगाव येथील औद्योगिक वसाहतीमध्ये वितरित झालेले अनेक भूखंड रिक्त असुन त्यावर कुठल्याही प्रकारचा उद्योग उभारला गेला नाही हे खरे आहे का,
(२) असल्यास, औद्योगिक मंडळाने वितरित केलेले भूखंड ज्यावर कुठल्याही प्रकारचा उद्योग उभारला गेला नाही शासन ते भूखंड परत घेऊन ज्यांना आवश्यकता आहे अशा सुशिक्षित बेरोजगारांना वितरीत करणार आहे का,
(३) असल्यास, उक्त मागणी बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने धामणगांव विकास केंद्राकरीता ९९.३५ हे.आर जमिन संपादीत केली आहे.धामणगांव विकास केंद्र दोन टप्यात विकसीत करण्यात येत आहे.

प्रथम टप्यात १८.३६ हे.आर क्षेत्र विकसीत करण्यात आले असून त्यामध्ये ३८ भूखंड आरेखित करण्यात आले आहेत.आरेखित भूखंडांपैकी ३४ भूखंडांचे वाटप करण्यात आले असून ४ भूखंड वाटपाकरीता शिल्लक आहेत. वाटप केलेल्या भूखंडाचा विकास कालावधीत बांधकाम पूर्ण करून उत्पादन सुरू करणे अपेक्षित आहे.तथापि भूखंडावरील परिणामकारक कार्यवाही पाहून मुदतवाढ देण्याचे म.औ.वि.महामंडळाचे धोरण आहे.

दुसऱ्या टप्यात ८०.९९ हे.आर क्षेत्र विकसीत करण्यात येत असून या ठिकाणी म.औ.वि.महामंडळामार्फत पायाभूत सुविधा पुरविण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

धामणगांव विकास केंद्रात वाटप करून विहीत कालावधीत विकसीत न केलेले भूखंड महामंडळाचे ताब्यात घेण्यात येतात. सद्यस्थितीत या ठिकाणी विकास कालावधी संपलेले भूखंड नाहीत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणानुसार परत घेतलेले भूखंड म.औ.वि.महामंडळाच्या संकेतस्थळावरून जाहीरात प्रसिद्ध करून सरळ पद्धतीने/ ई निविदा प्रक्रियेद्वारे गरजू उद्योजकांना भूखंडाचे वाटप करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**गडब, कारावी, डोलवी, वडखळ, कोळवे व बेनेघाट जि.रायगड, ता.पेण या गावांत होणारी औद्योगिक वसाहत (MIDC) रदद करणेबाबत**

**(८) ३६११८ (१२-०१-२०२२). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे-गडब, कारावी, डोलवी, वडखळ, कोळवे व बेनेघाट ता.पेण (जि.रायगड) ही गावे औद्योगिक वसाहतीकरीता (MIDC) घोषित करण्यात आली आहेत.हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदर गावे औद्योगिक वसाहतीकरीता (MIDC) घोषित करतांना स्थानिक शेतकरी,ग्रामस्थांना विश्वासात घेतले गेले नाही हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, औद्योगिक वसाहतीकरीता (MIDC) ला जमिनी देण्यास स्थानिकांनी आंदोलनाव्दारे प्रखर विरोध आहे हे खरे आहे काय.

(४) असल्यास, औद्योगिक वसाहतीकरीता (MIDC) रदद करून स्थानिकांना दिलासा देण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करित आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :** (१) हे अंशत : खरे आहे.

डोलवी औद्योगिक क्षेत्राकरीता दिनांक ०३.०२.२०२१ व दिनांक १५.०२.२०२१ रोजी प्रकरण ६ ची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. मौजे- गडब, डोलवी, कोळवे व बेनेघाट ही गावे प्रस्तावित भूसंपादनात आहेत.

(२) हे खरे नाही.

सदरचे भूसंपादन खातेदारांना विश्वासात घेऊन करण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदर औद्योगिक क्षेत्रात जेएसडब्ल्यू व इतर कंपन्यांमुळे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होवून स्थानिकांना रोजगाराच्या प्रकल्पग्रस्तांना पर्यायी उद्योग व्यवसायाच्या संधी उपलब्ध होणार आहे. डोलवी औद्योगिक क्षेत्राकरीता होणारे भूसंपादन महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ अन्वये होत असून खातेदारांची संमती प्राप्त झाल्यावर भूसंपादन होणार आहे. त्यामुळे जमीनधारकांवर भूसंपादनासाठी कोणतेही प्रकारची सक्ती केली जाणार नाही. सदरचे भूसंपादन योग्यते मोबदला देऊन करतांना गावी विस्थापित होणार नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील स्थानिक बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणेबाबत**

**(९) ३६४२१ (१२-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याची औद्योगिक प्रगती करीत असताना स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे शासनाची प्राथमिकता आहे त्यामुळे राज्याच्या औद्योगिक धोरणातील सुधारणा कामगार केंद्रस्थानी ठेवून कराव्यात. तसेच गुंतवणुकीबरोबरच रोजगार निर्मितीची क्षमता लक्षात घेऊन उद्योगांना सवलती दिल्या जातील, अशी माहिती राज्याचे मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास दिलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास,राज्यात विभागनिहाय हवामान व भौगोलिक स्थितीस अनुसरून उद्योग सुरू करावेत तसेच राज्यातून यापूर्वी बाहेर गेलेले उद्योग परत आणण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत, आवश्यकता असल्यास त्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा असेही माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उद्योग विभागाच्या आढावा बैठकीत संबंधित अधिकारी यांना सूचना केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने वरील सुचना संदर्भात काय चौकशी केली आहे,सदर चौकशीचे स्वरुप काय होते, चौकशीअंती काय निष्पन्न झाले व वरील सुचनाची अंमलबजावणी कधीपासुन करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (१६-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे. महाराष्ट्रातील स्थानिक युवकांना रोजगारांमध्ये प्राधान्य देण्याचे धोरण राज्य शासनाने सुरुवातीपासून अंगिकारले आहे. दि.१७/११/२००८ च्या शासन निर्णयानुसार सर्व औद्योगिक उपक्रमांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीमध्ये किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीय सहित इतर श्रेणीत किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नोक-या देणे बंधनकारक आहे. राज्याच्या औद्योगिक धोरणानुसार उद्योगांना प्रोत्साहने/सवलती देतांना संबंधित घटकाने राज्य शासनाच्या स्थानिक लोकांना रोजगार संधीबाबत विहित केलेल्या निकषांची पूर्तता होत असल्याची खातरजमा करण्यात येते. उद्योग घटकांमध्ये स्थानिक लोकांना रोजगार संधीत प्राधान्य मिळणेकामी उद्योग प्रवर्तकांना माहिती व मार्गदर्शन करण्यात येते. सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत मोठे, विशाल व अतिविशाल उद्योग घटकांनी केलेल्या गुंतवणूकीबरोबर रोजगार निर्मिती हा निकष देखील ठेवण्यात आला आहे. तसेच, सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांमध्ये सुद्धा ८० टक्के स्थानिक लोकांना रोजगार पूर्तता होत असल्याचे, प्रमाणपत्र सादर केल्यानंतर प्रोत्साहने मंजूर करण्यात येतात.

(२) हे खरे आहे.

(३) राज्यामध्ये उद्योगांची वाढ होऊन जास्तीत जास्त गुंतवणूक होण्यासाठी औद्योगिक धोरण-२०१९नुसार सामुहिक प्रोत्साहन योजना, कृषीवर आधारित अन्न प्रक्रिया उद्योगाचे धोरण, इलेक्ट्रॉनिक्स धोरण, इलेक्ट्रीक व्हेईकल धोरण, महिला धोरण, माहिती व तंत्रज्ञान धोरण, औद्योगिक समूह विकास कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अशा विविध धोरणांमधून विविध प्रकारची प्रोत्साहने दिली जातात व त्याव्दारे राज्यात अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित होईल, याबाबत कार्यवाही करण्यात येते. तसेच, प्रस्तावित व स्थापित उद्योग घटकांना सिंगल विंडो सहाय्यता अंतर्गत मैत्री कक्षामार्फ़त सर्व सुविधा व अडीअडचणींचे निराकरण करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजा कारंजा (जि. वर्धा) येथील विस्तारित औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासंदर्भात

**(१०) ३६७५० (१२-०१-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कारंजा,(ता. कारंजा,जि. वर्धा) येथील २३४ हेक्टर जमीनीवर विस्तारीत औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यासंदर्भात शासनाने सन २०१० वा त्या दरम्यान अधिसूचना जारी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील शेतकऱ्यांच्या जमीनीची खरेदी-विक्री व्यवहार बंद झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांनी जमीन अधीग्रहन कायदा २०१४ नूसार वाटाघाटी करून जमिनी अधिग्रहति करण्यास संमती दर्शविली असतांनी अद्याप जमीनी अधीग्रहन प्रक्रीया राबविण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करून चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील कलम ३२ (१) ची अधिसूचना दिनांक ०७.१२.२०२२ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड तालुक्यातील (जि.पुणे) सेझ प्रकल्पातील ६ गावांतील काही क्षेत्र वगळण्याबाबत

**(११) ३८५४७ (०९-०४-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील सेझ प्रकल्पातील टप्पा क्र.२ मधील ६ गावांतील गावे वगळण्याबाबत दिनांक २३ जून २०१७ रोजी वा त्या सुमारास एमआयडीसीने राज्य शासनास हा फेर प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,दिनांक १५.फेब्रुवारी, २०१८ रोजी व त्या सुमारास महत्त्वाचा निर्णय झाल्यानंतरही आजतागायत अधिसूचना निर्गमित झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निर्णय होऊन चार वर्षे झाली तरीही अधिसूचना निघाली नसल्याने या गावांतील शेतक-यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी गावे वगळण्याच्या अधिसूचना तातडीने निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) : (**१) ,(२) व (३) हे अंशत: खरे आहे.
खेड विशेष आर्थिक क्षेत्र टप्पा क्र. २ करीता दि.१७/०७/२००६ व दि.१७/०४/२०१० रोजीच्या अधिसूचनान्वये ३१६३.१५ हे.आर क्षेत्र अधिसूचित करण्यात आलेले आहे. सदर अधिसूचीत क्षेत्रापैकी ५६९.५२.५० हे.आर इतके क्षेत्र वगळण्यात आले आहे. तसेच उर्वरित क्षेत्र संबंधित भूधारकांचा विरोध असल्याने व सदर क्षेत्र समतोल नसून डोंगर उताराचे असल्याने वगळण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भू-निवड समितीने दि.१५/११/२०२२ रोजी स्थळपाहणी केली आहे. त्यानुसार सदर क्षेत्र वगळण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे आहेर वाहेगांव, ता.गेवाराई, (जि.बीड)येथील एमआयडीसी (लघु औद्योगिक क्षेत्र) स्थापन करण्याबाबत**

**(१२) ३८७७१ (०९-०४-२०२२). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे आहेर वाहेगांव, ता.गेवाराई, (जि.बीड) येथील शासकीय जमिनीवरील गट नं.२२९ मधील १७.२१ हेक्टर क्षेत्रावर एमआयडीसी (लघु औद्योगिक क्षेत्र) स्थापन करण्याचे दिनांक २१ मे २०१५ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अधीसूचित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड व भूसंपादन विभाग, एमआयडीसी यांच्यामध्ये जागेचे मुल्यांकन निश्चित करण्यावरून असलेल्या विसंगतीमुळे आजतागायत सदर एमआयडीसीची पुढील प्रक्रिया प्रलंबित राहिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी एमआयडीसी लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी सदर जागेचे मुल्यांकन निश्चित करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
गेवराई, जि. बीड येथे लघु औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मौजे आहेर वाहेगांव येथील सरकारी गट नंबर २२९, क्षेत्र १७.२१ हे.आर क्षेत्र दि. २१/०५/२०१५ रोजी अधिसूचित करुन सदरील जमिनीची संयुक्त मोजणी करण्यात आली आहे.
त्याअनुषंगाने सदर लघु औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित होणाऱ्या १७.२१ हे.आर क्षेत्र हे बिगरशेती जमिन गृहित धरुन सन २०१७-२०१८ चे शिघ्र-सिध्द गणकानुसार परिगणित करण्यात आलेली रक्कम शासनाकडे भरणा करणेबाबत दि. ०८/११/२०१७ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांनी कळविले आहे.
मौजे आहेर वाहेगाव येथील जिरायत जमिनीचे मुल्यांकन सन २०१७-१८ साठीचे शिघ्र-सिध्द गणकाचे दरानुसार करणे आवश्यक असल्याने त्याबाबत मऔवि महामंडळास जिल्हाधिकारी,बीड यांनी दि. १४/०९/२०१८ रोजी कळविले आहे.
तद्नंतर सदर सरकारी १७.२१ हेक्टर आर क्षेत्राचे जिरायत जमिनीचे सन २०२१-२०२२ च्या शिघ्र-सिध्द गणकाप्रमाणे मुल्याकंन परिगणित करुन उक्त क्षेत्राचे मुळ मुल्यांकनाबाबतचा फेर प्रस्ताव पाठविण्याबाबत मऔवि महामंडळानी दि. २९/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना कळविले आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी

मुल्यांकन रक्कम शासनाखाती जमा करणेबाबत कळविले आहे. त्याअनुषंगाने मऔवि महामंडळाच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलकापूर, (जि.बुलढाणा) एमआयडीसी येथे अग्निशमन यंत्रणा उभारणे बाबत..

**(१३) ३९३६० (०९-०४-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर (जि.बुलढाणा) हे विदर्भाचे प्रवेशद्वार असलेले शहर राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ तसेच नागपूर- मुंबई रेल्वे मार्गावर वसलेले असून रा.मा. क्र.६ वरील शहरापासून साधारण १०-१२ किमी अंतरावर असलेल्या एमआयडीसी पासून जवळ अंतरावरील भारत पेट्रोलियमच्या गॅस टँकरला शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची घटना दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शहरानजीकच्या एमआयडीसीमध्ये लहान-मोठे पंधरा ते वीस उद्योग सुरु असून एमआयडीसीकडे या उद्योग, कंपन्या आणि कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून स्वतःची अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी यापूर्वी देखील एमआयडीसीमधील जी.एस. ऑइल मिल, अनंत कृपा पेपर मिल या ठिकाणी आग लागून उत्पादित मालाचे नुकसान झाल्याच्या घटना घडलेल्या असताना उद्योग क्षेत्राची हानी टाळण्यासाठी व कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अग्निशमन यंत्रणा उभारणे निकडीचे असताना केवळ वाहन चालक, अन्य सहकारी आणि अग्निशमन वाहनाचा देखभाल खर्च कोण करणार या तांत्रिक बाबींच्या अभावी अद्यापही याठिकाणी अग्निशमन यंत्रणेला शासनाकडून मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एमआयडिसी कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून स्वतःची अग्निशमन यंत्रणा तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) हे खरे आहे.

मलकापूर औद्योगिक क्षेत्रात मऔवि महामंडळाची अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नाही. परंतू, औद्योगिक क्षेत्रापासून सुमारे १० कि.मी. अंतरावर नगर परिषद, मलकापूर यांची अग्निशमन व्यवस्था आहे. प्रसंगी मलकापूर नगर परिषद मार्फत अग्निशमन सेवा पुरविण्यात येते.

मलकापूर औद्योगिक क्षेत्रात औद्योगिक संघटनेमार्फत अग्निशमन केंद्र प्रस्थापित करुन कार्यान्वित करण्याबाबत अद्याप कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही. परंतू, औद्योगिक संघटनेने अग्निशमन केंद्र प्रस्थापित करुन कार्यान्वित करण्याबाबत मागणी केल्यास व उद्योजक संघटनेने त्यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये फायर सेस भरण्यास तयार असल्याबाबतचा ठराव पारीत करुन सदर ठरावाची प्रत सादर केल्यानंतर मऔवि महामंडळाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने अग्निशमन केंद्र प्रस्थापित करुन कार्यान्वित करण्याबाबत विचार करण्यात येईल.

---

## चाकण एमआयडीसीतील रस्त्याच्याकडेला अवैध्यारीत्या पार्किंग केलेल्या वाहनामुळे अपघात होत असल्याबाबत

**(१४) ४०१४६ (०९-०४-२०२२). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील चाकण एमआयडीसी येथील रस्त्याच्या कडेला अवजड वाहनांची बेकायदेशीर पार्किंग होत असल्याने उक्त भागात अपघातांची संख्या वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी एमआयडीसीमार्फत कायमस्वरूपी वाहनतळ बांधण्याबाबत टाळाटाळ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने उक्त ठिकाणी वाहनतळ बांधून अपघात न होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :**(१), (२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्रमांक १, २, ३ व ४ विकसीत करण्याकरीता अनुक्रमे २५७.८, १४४८.२६, ५८६.४४ व ४०७.६४ हे.आर जमीन संपादीत केलेली आहे. चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्रमांक २ मधील भूखंड क्रमांक ए.एम.२/२ (भूखंड क्षेत्रफळ ६८३६७ चौ.मिटर) या भूखंडावर वाहनतळाचे बांधकाम (क्षेत्रफळ २५९३३ चौ.मिटर) पूर्ण केले आहे. तसेच सदर वाहनतळ चालविण्याकरीता दि.१९/०५/२०२२ व ०९/०६/२०२२ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. तथापि, सदर निविदेस कोणताही प्रतिसाद प्राप्त झालेला नसल्याने पुनश्च: निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यात आयटी पार्क उभारण्याबाबत

**(१५) ४०७५६ (०९-०४-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहर व जिल्ह्यात एकूण १५ अभियांत्रिकी महाविद्यालये असून त्यातून दरवर्षी चार ते साडेचार हजार विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडत आहेत तसेच त्यांना नोकरी करण्याकरिता इतरत्र जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू विद्यार्थ्यांकरिता सोलापूर जिल्ह्यात आयटी पार्क उभारल्यास रोजगारी संधी उपलब्ध होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तुत मागणीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात आयटी पार्क उभारण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४ ) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :**१), २) व ३) सोलापूर येथील चिंचोली औद्योगिक क्षेत्रातील भुखंड क्रमांक के-३७ (क्षेत्र ७२०० चौ.मिटर) वर गारमेंट या प्रयोजनार्थ इमारत बांधण्यात आली होती. सदर गारमेंट इमारतीला मागणी न आल्याने सन २००१ साली सदर इमारतीच्या वापरात माहिती तंत्रज्ञान इमारत (IT Building) असा बदल करण्यात आला आहे. सदर माहिती तंत्रज्ञान इमारत निविदा पध्दतीने मासिक भाडेतत्त्वावर वाटप करण्याकरीता दि.१३/११/२०१५ ते २४/११/२०१५ या कालावधीत जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, सदर निविदेला प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अद्याप इमारतीचे वाटप करण्याची कार्यवाही होऊ शकली नाही. सदर माहिती तंत्रज्ञान इमारतीस मागणी प्राप्त झाल्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार वाटप करण्याबाबतची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठास माहेड ने २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी २५५ बिंदू (ठिकाणे) निश्चित करण्याबाबत**

**(१६) ४४७३२ (१७-०९-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठास माहेड ने २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी २५५ बिंदू (ठिकाणे) निश्चित करुन दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन महाविद्यालयांसाठी व तुकडीवाडीसाठी एकुण किती प्रस्ताव प्राप्त झाले आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावांपैकी किती प्रस्ताव मुंबई विद्यापीठाने व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजूर झाले आहेत,

(४) असल्यास, सदर प्रस्तावांस शासनाने मंजूरी दिली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०३-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नवीन महाविद्यालयांचे एकूण ९० आणि तुकडीवाढीसाठी एकूण ६८ प्रस्ताव प्राप्त झाले.

(३) व्यवस्थापन परिषदेमध्ये नवीन महाविद्यालयांचे एकूण ७० प्रस्ताव आणि तुकडीवाढीसाठी एकूण ४७ प्रस्ताव मंजूर झाले.

(४) नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरिता एकूण ४७ आणि तुकडीवाढीसाठी एकूण ४४ प्रस्तावांना शासनाकडून अंतिम मान्यता देण्यात आली.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पी व्ही सी पाईप तयार करण्याऱ्या कंपन्यांनी आयएसआय ने ठरवून दिलेल्या दर्जानुसारच पाईप तयार करण्याची शासनाने केलेली सक्ती**

**(१७) ४४७८४ (२३-०९-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पी व्ही सी पाईप तयार करणाऱ्या कंपन्यांनी आयएसआय ने ठरवून दिलेल्या दर्जानुसारच पाईप तयार करावेत, अशी सक्ती शासनाकडून करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयएसआय सक्तीमुळे वार्षिक ४० लाख टन कचऱ्याचा पुनर्वापर करणारे सुमारे २२०० उद्योग संकटात येणार असून ५ लाख रोजगारांचा प्रश्न निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, उद्योगांना सुट देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (१६-१२-२०२२) :** (१) केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने आणि जलवायू परिवर्तन मंत्रालयाच्या दि.३०/०३/२०२१ च्या अधिसूचनेन्वये पी.व्ही.सी पाईप आणि फिटींग वर नाममुद्रा प्रदर्शीत करण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(२) असे दिसून आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील शिधावाटप कार्यालयामधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१८) ४५६७१ (१७-०९-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व परिसरातील शिधावाटप कार्यालयामध्ये अधिकारी व कर्मचारी यांची ४० टक्के पदे रिक्त असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचारी व अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने सामान्य नागरिकांना विशेषत: मानखुर्द – शिवाजीनगर सारख्या झोपडपट्टी विभागात राहणारे नागरिकांना शिधावाटप पत्रिका मिळण्यास व धान्य मिळण्यासाठी अडचण निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पदे रिक्त असलेल्या शिधावाटप कार्यालयामध्ये कर्मचारी व अधिकारी यांची नियुक्ती करण्याची मागणी लोकप्रतिनिधी, सामान्य नागरिक व सेवाभावी संस्था यांच्यामार्फत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-०२-२०२३) :** (१) हे खरेनाही.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) जनतेच्या मागणीनुसार व लोकप्रतिनिधींच्या आग्रहास्तव मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रातील फ परिमंडळ कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या मुंब्रा या विभागात शि.का.क्र.४८ फ सुरु करण्यात आले. विभागाचा सुधारित आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर शि.का.क्र.४८ फ कार्यालयाकरिता २१ पदे व शि.का.क्र.४४ ई कार्यालयाकरिता ३४ पदे मंजूर करण्यात आली आहेत. मुंबई-ठाणे क्षेत्रातील लिपिक टंकलेखकांची सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरिता दिनांक २७/१२/२०२२ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दक्षिण सोलापूर तालुका (जि. सोलापूर) येथील मंद्रूप परिसरात एमआयडीसी स्थापन करण्याबाबत

**(१९) ४५७६२ (२३-०९-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर (जि. सोलापूर) येथील मंद्रूप परिसरात तालुक्याच्या विकासासाठी मागील तीन वर्षापूर्वी एमआयडीसी मंजूर होवूनही अद्यापपर्यंत एमआयडीसीची स्थापना झाली नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एमआयडीसीच्या भूसंपादनाकरिता १३०० एकर शेत जमिनीचे क्षेत्र आरक्षित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सीना व भीमा नदी खोऱ्यातील मंद्रूप परिसरातील शेतकऱ्यांच्या बागायती क्षेत्रातील जमिनींकरिता बाजार भावाच्या सहा पट दराने मोबदला न देण्याच्या निर्णयामुळे शेतक-यांकडून भूसंपादनास विरोध होत आहे, हे ही खरे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मंद्रूप एमआयडीसीसाठी आरक्षित जमिनींकरिता बाजार भावानुसार योग्य मोबदला देवून एमआयडीसीचे काम त्वरीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मौजे मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील एकूण

५२९.८०२ हे.आर क्षेत्रासाठी प्रकरण ६ ची अधिसूचना दि. ११-१७ जुलै, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर औद्योगिक क्षेत्रासाठी संपादनाधिन क्षेत्राचे ७/१२ उताऱ्यावर इतर अधिकारात मऔवि महामंडळाच्या नावांची नोंद झालेली आहे. सदर क्षेत्र संपादनास खातेदारांचा विरोध असल्याने क्षेत्राची संयुक्त मोजणी पूर्ण होऊ शकलेली नाही. अधिसूचित क्षेत्रापैकी २७३.१८ हे.आर क्षेत्राची संयुक्त मोजणी झाली आहे. मात्र, बहुसंख्य संबंधित खातेदारांनी संपादनास विरोध दर्शविला असल्याने २५६.६२२ हे.आर क्षेत्राची संयुक्त मोजणी होवू शकलेली नाही. संपादनास संमती देणाऱ्या खातेदारांनी रु. ६५ लाख प्रति हेक्टरी दराची मागणी केली आहे. त्यामुळे सदर क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही प्रलंबित आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

दि. १९/०८/२०१९ रोजी झालेल्या १११ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत सदर क्षेत्रासाठी प्रती हेक्टर रु. २५,००,०००/- दर मंजूर करण्यात आलेला आहे. बहुतांशी शेतकऱ्यांचा संपादनास विरोध आहे. तसेच संमती दर्शविलेल्या खातेदारांनी रु. ६५ लाख प्रति हेक्टर दराची मागणी केली आहे.

बहुसंख्य शेतकऱ्यांचा औद्योगिक वसाहतीकरिता संपादनास व मऔवि महामंडळाने दिलेला दर मान्य नसल्याने भूसंपादनास विरोध होत आहे.

(४) दि. २९/०९/२०२२ रोजी उपविभागीय अधिकारी क्र. २ सोलापूर, प्रादेशिक अधिकारी, सांगली व मंद्रुप येथील भूधारक शेतकरी यांचे समवेत जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैठक झाली. सदरच्या बैठकीत बहुसंख्य भूधारक शेतकऱ्यांनी जमीन संपादनास विरोध दर्शविला व त्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील मऔवि महामंडळाचे नाव कमी करण्याबाबत आग्रही मागणी केली. तसेच भूसंपादनातून जमीन वगळण्याची मागणी करणाऱ्या भूधारक शेतकऱ्याच्या सह्यांचे निवेदन दिले. तसेच काही भूधारक शेतकरी यांनी मऔवि महामंडळाने जाहीर केलेला संपादनाचा रु. २५ लाख प्रति हेक्टरी हा दर मान्य नसून रु. ६५ लाख प्रति हेक्टरी हा दर देण्याची मागणी केली. सदरचा दर न मिळाल्यास जमिन संपादनास विरोध कायम राहील, असे नमूद केले आहे.

त्याअनुषंगाने खातेदारांचा संपादनास विरोध तथा संमतीनुसार संपादनाबाबत निर्णय घेणेकरीता मऔवि महामंडळाच्या भूनिवड समितीमार्फत स्थळपाहणी करुन निर्णय घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वाळूज एम आय डी सी विस्तार क्षेत्रात झालेल्या जमीन खरेदीची चौकशी होण्याबाबत

**(२०) ४६२४१ (०६-१०-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळूज (जि.औरंगाबाद) येथील एम आय डी सी वसाहतीसाठी ७५० एकर जमीन संपादीत करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी भविष्यात होणारे प्रकल्प लक्षात घेता, एम आय डी सी विभागातील अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात जमीन खरेदी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर प्रकरणी याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) : (१)**, (२) व (३) मौजे आरापूर, गवळी शिवरा व सलतानाबाद येथील ७५२.४३ हे.आर खाजगी व ९.६० हे.आर सरकारी अशा एकूण ७६२.०३ हे.आर क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ अन्वये प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागू करण्यास उच्चाधिकार समितीच्या १४२ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ अन्वये प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागू करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाणार (जि.रत्नागिरी)येथील तेलशुध्दीकरण प्रकल्प बारसू या ठिकाणी उभारण्याचा राज्यशासनाने घेतलेला निर्णय

**(२१) ४६४२४ (०६-१०-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील नाणार येथील तेलशुध्दीकरण प्रकल्प बारसू या पर्यायी ठिकाणी उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प उभारणीच्या संदर्भात राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :** (१) व (२) शासनाच्या दिनांक १२.०१.२०२२ च्या पत्रान्वये रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील मौजे बारसू येथे १३,००० एकर क्षेत्र उपलब्ध असल्याबाबत तसेच क्रुड ऑईल टर्मिनलकरीता मौजे नाटे, तालुका राजापूर, जिल्हा रत्नागिरी येथील २,१४४ एकर क्षेत्र उपलब्ध असल्याचे केंद्र शासनास कळविले आहे.

माहे मे-जून, २०२२ पासून हरित रिफायनरी प्रकल्पाकरीता प्राथमिक सर्वेक्षणाचे काम M/s. RRPCL यांच्यामार्फत सुरु करण्यात आला आहे. तसेच बारसू तालुका राजापूर, जिल्हा रत्नागिरी येथील हरित पर्यावरणपुरक रिफायनरी प्रकल्पाबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी येथे दिनांक १३.०६.२०२२ रोजी सदर प्रकल्प पर्यावरणपुरक असून ग्रामस्थांना व जमीन मालकांना कसा फायदा होणार आहे, याबाबत चर्चा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर तालुक्यातील (जि. ठाणे) वासिंद येथील जेएसडब्लू (जिंदाल) कंपनीमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना नोकरी देणेबाबत

**(२२) ४६६५३ (०६-१०-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नियमानूसार भूमिपुत्रांना रोजगारात पर्यवेक्षीय श्रेणीत ५० टक्के तर पर्यवेक्षीकीय श्रेणीत ८० टक्के या प्रमाणात कायमस्वरुपी नोकरी देणे अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुक्यातील वासिंद येथील जेएसडब्लू (जिंदाल) कंपनीमध्ये स्थानिक भूमिपुत्र असलेल्या बेरोजगार तरुणांना डावलण्यात आले असून स्थानिक प्रशासनाला व कंपनी व्यवस्थापनेला वेळोवेळी पत्र व्यवहार करुनही कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहापूर तसेच लगत स्थानिक कुशल, अकुशल मनुष्यबळ उपलब्ध असतांनासुध्दा जिंदाल व्यवस्थापनाने हरियाणा व इतर राज्यातून मनुष्यबळ आणून उत्पादन सुरु केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जेएसडब्लू कंपनीने या वर्षी तयार झालेल्या कंपनीच्या नवीन कलरकोटींग प्रकल्पात देखील स्थानिक भूमिपुत्रांना रोजगारापासून वंचित ठेवले असून याविरोधात बेरोजगार संघर्ष सेनेने मोर्चाचे दिनांक ३ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, संबंधित कंपनीवर कारवाई करुन स्थानिक भूमिपुत्रांना कंपनीत नोकरीत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१६-१२-२०२२) :** (१) शासन निर्णय क्र.स्थालोरो-२००८/प्र.क्र.९३/उद्योग-६,दि.१७/११/२००८ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यातील सर्व औद्योगिक घटकांमध्ये पर्यवेक्षीय श्रेणीत ५० टक्के तर पर्यवेक्षकीय सह इतर श्रेणीत ८० टक्के स्थानिक उमेदवारांना
नोकरीत प्राधान्याने घेण्याबाबत शासनाचे धोरण आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) मे.जेएसडब्लू पेंटस प्रा.लि. या घटकाचे दि.३१.०३.२०२२ अखरेचे स्थालोरो प्रपत्र-१ नुसार स्थानिक रोजगारांची संख्या पर्यवेक्षकीय श्रेणीत ८०.००% व पर्यवेक्षकीयसहीत इतर श्रेणीत ८१.९४% इतकी आहे. या संदर्भात बेरोजगार सेनेच्या निवेदनानुसार पुन्हा पडताळणी करण्यात आली असून सदर कंपनीत शासनाच्या धोरणानुसार स्थानिकांना रोजगार दिल्याचे दिसुन आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये उद्योगधंदे उभारताना कामगारांना पायाभूत सुविधा औद्योगिक वसाहतीमध्ये उपलब्ध् होणेबाबत

**(२३) ४६९७१ (२५-०९-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नविन औद्योगिक विकास महामंडळामध्ये उद्योगधंदे उभारणीनंतर परराज्यातून मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या कर्मचारीवर्गाच्या निवास वास्तव्यामुळे त्या त्या ठिकाणच्या शेजारील गावांतील पायाभूत सुविधांवर अतिरिक्त ताण पडत असल्याचे निदर्शनास आले आहे,

(२) असल्यास, सदर नविन एमआयडीमधील उद्योगधद्यांमार्फत त्या त्या परिसरातील ग्रामपंचायतींना कोणत्याही स्वरुपाची मदत केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन औद्योगिक विकास महामंडळामध्ये उद्योगधंदे उभारणी करताना कर्मचाऱ्यांची वाढती संख्या लक्षात घेवून त्यांच्या निवासाकरिता मूलभूत सोयी-सुविधायुक्त वसाहती तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :**(१),(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये काम करणाऱ्या कामगारांकरीता नवीन औद्योगिक क्षेत्राचा आराखडा प्रस्तावित करतांना रहिवासी विभाग/ सहाय्यभूत सेवा वापरासाठी २० टक्के क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत स्वतंत्र झोन निश्चित करुन ठेवण्याबाबतचा ठराव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बैठकीत पारीत करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सुधारित विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार सहाय्यभूत सेवा (Residential, Educational, Institutional, Assembly, Mercantile इ.) वापर अनुज्ञेय आहे. तसेच १ एकर क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या गैर रासायनिक भूखंडावर १० टक्के पर्यंतचे क्षेत्र आवश्यक कर्मचारी निवास (Essential Staff Quarter) करीता अनुज्ञेय आहे. त्यानुसार महामंडळाच्या काही औद्योगिक क्षेत्रांमध्ये रहिवासी क्षेत्रे (Residential Zone) विकसीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील हिंगणी- आमला - कान्नापुर पुलाच्या कामाची तपासणी करण्याबाबत**

**(२४) ४७५२५ (२१-०९-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील हिंगणी- आमला - कान्नापुर कि.मी. १७/२०० मध्ये बोंधेगाव जवळ लहान पुलाचे काम प्रजिमा-५०, परळी जि.बीड चे काम सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबेजोगाई (जि.बीड) यांच्यामार्फत पुर्ण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तांत्रिक मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकानुसार काम पुर्ण न करता निकृष्ट दर्जाच्या कामाची गुणनियंत्रण विभागामार्फत तपासणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२५-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पुलाचे बांधकाम तांत्रिक मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकानुसार गुणवत्ता पूर्वक पुर्ण केले आहे. आवश्यकतेप्रमाणे दक्षता व गुण नियंत्रण विभागाकडून चाचणी अहवाल घेतले आहेत.

सदरचे चाचणी अहवाल मानकाप्रमाणे आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील तारापूर एमआयडीसीमधून समुद्रात सोडण्यात येणा-या पाईपलाईनला नवापूर गावातील ग्रामस्थानी केलेला विरोध**

**(२५) ४७८३७ (२०-०९-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) येथील एमआयडीसीमधून समुद्रात सोडण्यात येणा-या पाईपलाईनला नवापूर गावातील ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाईपलाईनचे काम पोलीस बळाचा वापर करुन सुरु करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार ग्रामस्थांच्या विरोधाच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०७-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि दि.१५.०८.२०१५ च्या ग्राम सभेत विषय क्र.२(२) व ठराव क्र.७ (२) प्रमाणे पारित झालेल्या ठरावानुसार व नवापूर ग्रामपंचायत यांनी दि. १४.०९.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अटी व शर्तीस अधिन राहून पाईपलाईनचे काम करणेस परवानगी दिली आहे.

(२) हे खरे नाही

म.औ.वि.महामंडळाने दि. ०६.०५.२०२२ रोजीच्या पत्रानुसार वरीष्ठ पोलीस निरीक्षक, सातपाटी ता.जि.पालघर यांना बोईसर गावातून आलेवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी १२०० मि.मि.व्यासाची जलनि:सारण वाहीनी टाकण्याचे प्रयोजन असल्यामुळे पर्यायी मार्गाने वाहतूक

नियोजन कामी सहकार्याची विनंती केली होती.

(३) ग्रामपंचायत कार्यालयाच्या दि. १४.०९.२०१५ रोजीच्या मिळालेल्या परवानगीमध्ये गावाची विकास कामे जसे की, अंतर्गत रस्ते,मुलांसाठी खेळणी, समुद्रकिनारी बसण्यासाठी बाक, गावासाठी प्रवेशद्वार इ. कामे सुचविण्यात आली असून सदरहू कामे अंतिम टप्यात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माजलगाव (जि.बीड) तहसील कार्यालय,येथील खड्यात भराव व सिमेंट कॉक्रीटचा रस्ता करणे व पेव्हर ब्लॉक बसवणेबाबत.

**(२६) ४८०८७ (३१-१०-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तहसील कार्यालय, माजलगाव जि.बीड येथील खड्यात भराव भरणे, सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे व पेव्हींग ब्लॉक बसवणे या कामाचा रु.१७,४७,६३२/- एवढ्या रक्कमेचा कार्यारंभ आदेश सा.बां. विभाग, अंबेजोगाई जि.बीड यांनी दिनांक ३० एप्रिल, २०२१ रोजी वा त्यादरम्यान श्री.वसीम शमशोद्दीन खतीब या कंत्राटदारास दिला आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर कामाची कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग,अंबेजोगाई जि.बीड यांनी निरिक्षण टिप्पणी दिनांक ७ एप्रिल, २०२२ रोजी देवुन कामामध्ये वाढ करून कामाची किंमत ३० लक्ष रूपये केली आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाचे ३० लक्ष किंमतीचे देयक दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी कंत्राटदारास अदा केले आहे काय,

(४) असल्यास, सदर चे काम दिनांक ३१ मार्च, २०२२ पुर्वी पुर्ण न होता व निरिक्षण टिप्पणी दिनांक ७ एप्रिल, २०२२ रोजीची असताना कंत्राटदारास वाढीव रक्कमेसह दिनांक ३१ मार्च २०२२ पुर्वी देयक अदा केल्या प्रकरणी दोषी कनिष्ठ अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या विरुद्ध काय कार्यवाही करणार ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अंबेजोगाई जि.बीड यांनी दि.११.०१.२०२२ रोजी कामास भेट देऊन दि.१३.०१.२०२२ रोजी निरीक्षण टिपणी निर्गमित केली आहे. उपभोक्ता विभागाच्या मागणीनुसार कामाच्या बचतीतून नवीन रस्त्याचे काम हाती घेतल्याने कामाची वाढीव किंमत रु.४०.४४ लक्ष झाली आहे.

(३) सदर कामाचे रु.३० लक्ष किमतीचे पहिले व अंतिम देयक दि.३१.०३.२०२२ रोजी पारित करण्यात आले असून त्यापैकी केवळ रु.४.५० लक्ष इतकी रक्कम कंत्राटदारास दि.३१.०३.२०२२ रोजी अदा करण्यात आली असून उर्वरित रक्कम ठेव ठेवण्यात आली होती.

(४) सदर काम ३१.०३.२०२२ पुर्वीच झालेले असून निरिक्षण टिपणी दि.११.०१.२०२२ रोजीची आहे. सदर कामाचे देयक काम पूर्ण झाल्यानंतर अदा करण्यात आले असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## पारध ते पिंपळगाव रेणूकाई. धावड (ता. भोकरदर जि. जालना) येथील रस्त्याचे काम निकृष्टदर्जाचे झाल्याबाबत

**(२७) ४८२१८ (३१-१०-२०२२). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारध ते पिंपळगाव, रेणूकाई,धावड (ता. भोकरदन जि. जालना) येथील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास, रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाच्या झाल्यामुळे रस्ते खड्डेमय होवून वाहतुकीस धोकादायक झाले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्यांची कामे निकष्ट दर्जाचे करणाऱ्या ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०२-२०२३) :**(१) व (२) सदर रस्त्यावरील १ कि.मी. लांबीत रस्ता नादूरुस्ती झाला हे खरे आहे.

(३) नादूरुस्त झालेल्या लांबीत संबंधीत कंत्राटदारामार्फत डांबरीपृष्ठ भाग सुधारणेचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगाव - औरंगाबाद येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत.

**(२८) ४८२५४ (२५-०९-२०२२). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव-औरंगाबाद येथील रस्त्याची गत काही वर्षापासून दयनीय अवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघात व वाहनाची हानी टाळण्यासाठी पर्यायी मार्गाचा अवलंब करुन मराठवाडाकडे जाणाऱ्या वाहनधारकांना तीस ते पस्तीस किमी लांब पल्ल्याच्या मार्गाने जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी नागरीकांकडून व प्रवाशांकडून वारंवार सार्वजनिक बांधकाम विभागास करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्ती करण्याच्या अनुषंगाने शासनाने काय निर्णयात्मक कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०२-२०२३) :** (१) व (२) सदर रस्त्यावरील खड्डे वेळोवेळी भरुन रस्त्यावर वाहतूक सुरळीत चालु आहे.

(३) होय.

(४) सदर रस्त्यावरील सा.बां. विभागाकडील रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता वाहतूकीकरीता सुस्थितीत आहे.

राष्ट्रीय महामार्गाकडील लांबीमध्ये १५.८५ कि.मी. लांबीत डांबरीकरणासह चौपदरीकरणाचे व ४ कि.मी. डांबरीकरणासह दुपदरीकरणाचे प्रगतीत असलेले काम एप्रिल, २०२४ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच १० कि.मी. लांबीत डांबरीकरणासह दुपदरीकरणाचे प्रगतीत असलेले काम एप्रिल, २०२३ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली नगर परिषद अंतर्गत करण्यात आलेल्या भूमिगत नाली व रस्त्यांच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(२९) ४८५९७ (२५-०९-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली नगर परिषद अंतर्गत सन २०१७-२०१८ या कालावधीत वैशिष्टपूर्ण विशेष निधी ठोक तरतूद अंतर्गत भूमिगत नाली व रस्त्यांचे बांधकाम करण्याकरिता १५ कोटी रुपयांची कामे करण्यात आल्याची बाब माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे रस्ता पुर्णत: खचल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील कामाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुंषगाने संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत तसेच या रस्त्यावरील अपघात टाळण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. रविंद्र चव्हाण (१३-०२-२०२३) :** (१) होय,हे खरे आहे.

गडचिरोली नगर परिषद अंतर्गत भूमिगत नाली व रस्त्याचे बांधकाम करण्याकरिता सन २०१७-१८ या कालावधीत वैशिष्ठपूर्ण विशेष ठोक तरतूद अंतर्गत ८ कामांना रुपये १५.०० कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. सर्व कामे भौतिक दृष्टया पुर्ण झालेली आहेत.

(२) व (३)

सदरहू रस्त्याचे काम सुरु असतांना स्थानिक नागरिकांच्या वाहतुक व रहादारीच्या वर्दळीमुळे काही ठिकाणी अत्यल्प प्रमाणात नादुरुस्त झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम संबंधीत कंत्राटदारांने सर्वतोपरी पूर्ण केले असून सद्यस्थितीत रस्त्यांवरुन वाहतुक सुरळीत चालू आहे. सदर कामाकरिता संबधित दक्षता व गुणनियंत्रण मंडळामार्फत कामाची आकस्मिक तपासणी करण्यात आली असून यामध्ये कामांच्या गुणवत्तेबाबत कोणतेही आक्षेपार्ह शेरे नोदविण्यात आलेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय (जि.उस्मानाबाद) शासनाकडे हस्तांतरित करण्याबाबत**

**(३०) ४८७६९ (२०-०९-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय महाराष्ट्र शासनास हस्तांतरित करण्याची मागणी दिनांक २२ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोक प्रतीनिधिंनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यासह उस्मानाबाद जिल्ह्यातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांची शासकीय शुल्कामध्ये तांत्रिक शिक्षणाची सोय होवून या भागाचा शैक्षणिक व आर्थिक विकास व्हावा यासाठी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान विश्वस्तांनी दिनांक २६ मे, २०१७ च्या बैठकीमध्ये सदर महाविद्यालय महाराष्ट्र शासनास हस्तांतरित करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाविद्यालयात प्रवेश वाढविण्याच्या अनुषंगाने येथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता व महाविद्यालयाचा दर्जा सुधारणेकरिता अभ्यास गट नेमून मार्गदर्शन करण्यासाठी समितीची नेमणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर महाविद्यालय हस्तांतारित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास़, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०३-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर हे महाविद्यालय कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु असून याबाबत दि.१३.०४.२०२२ रोजीच्या बैठकीनुसार महाविद्यालयातील विविध प्रशासकीय व आस्थापना विषयक बाबींचा आढावा घेण्यासाठी संस्थानाने त्यांच्या स्तरावर समिती गठित केली आहे.

संस्थानाने त्यांच्या स्तरावर समिती गठित केली आहे.

(४) शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे कायम विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांना शासनाच्या अनुदानित म्हणून दर्जा देण्याचे शासनाचे धोरण नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील रस्त्यांच्या कामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३१) ४९४०६ (११-११-२०२२). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याच्या कामास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करण्याबाबत तसेच प्रलंबित रस्त्याची कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०१-०२-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) मार्च-२०२१ मध्ये ३ कामे मंजूर झाली असून त्यामध्ये ११.०० कि.मी. लांबीचे काम पूर्ण झाली असून सदर लांबी सुस्थितीत आहे व १३.०० किमी लांबीचे काम प्रगतीत आहेत. तसेच मार्च २०२२ मध्ये १ काम मंजूर असून पुरवणी अर्थसंकल्प ऑगस्ट,२०२२ अंतर्गत १८ कामे मंजूर आहेत. या कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करून कामे कार्यान्वित करण्यात येत आहेत.

उर्वरित रस्त्यांची कामे निकष,मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा व कर्जत (जि. अहमदनगर) तालुक्यातील लोहकरा पूलाच्या दुरूस्तीबाबत**

**(३२) ४९४१३ (११-११-२०२२). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा व कर्जत (जि.अहमदनगर) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येत असलेला लोहकरा पूल हा दोन्ही तालुक्याच्या सरहद्दीवर येत असूनही सदर पुलाच्या विकासाकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुलाची दुर्घटना झाल्यास मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता असल्याने या पुलाच्या कामांसाठी अनेकवेळा पाठपुरावा करूनही त्याचे काम पूर्ण झाले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोहकरा पूलाचे सर्वेक्षण करुन बांधकामासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर ठिकाणी अस्तित्वातील कॉजवेच्या दुरूस्तीचे काम मे,२०२१ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत कॉजवे वाहतूकीकरिता सुस्थितीत आहे.

(३) सदर ठिकाणी उंच पातळीचा पूल बांधणेचे काम निधी, निकष व प्राध्यान्य क्रमानूसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाटाला पर्यायी मार्ग म्हणून लोटे-चिरणी-आंबडस-चिपळूण रस्त्याच्या कामाबाबत**

**(३३) ४९६०४ (१८-०१-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वरील रत्नागिरी जिल्हयातील परशुराम घाटाला पर्यायी मार्ग म्हणून लोटे-चिरणी-आंबडस-चिपळूण या रस्त्याला राज्य मार्गाचा दर्जा देण्यात येईल, असे आश्वासन दिनांक १० मार्च, २०२२ रोजी तत्कालिन मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिले होते आणि त्यानुसार हा रस्ता दर्जोन्नत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दर्जोन्नत करण्यात आलेल्या या राज्य महामार्गाच्या कामासाठी निधीची तरतूद करून काम लवकरात लवकर काम सुरू करावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १/११/२०२२ च्या पत्रान्वये मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०२-२०२३) :** (१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वरील रत्नागिरी जिल्हयातील परशुराम घटाला पर्यायी मार्ग म्हणमन लोटे-चिरणी-आंबडस-चिपळूण या रस्त्याला प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ९सप्टेंबर, २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) होय,हे खरे आहे.

(३) निधी व निकषाच्या अधिनतेने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**मराठी भाषा भवनाचे केंद्र व उपकेंद्र उभारण्याबाबत**

**(३४) ४९६९४ (१९-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चर्नीरोड येथे मराठी भाषा भवन केंद्र तसेच नवी मुंबई येथील ऐरोली येथे उपकेंद्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत बांधण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियोजित वास्तु प्रकल्पासाठी १२६ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून या वास्तुमध्ये २०० आसन क्षमतेचे बहुउद्देशीय सभागृह १४५ प्रेक्षकांची क्षमता असलेले ॲम्फी थिएटर, चार मजल्यांवर प्रदर्शनासाठी जागा तसेच प्रशासकीय व कार्यालयीन कामकाजासाठी जागा इ. सह अन्य सोईसुविधांचा त्यामध्ये समावेश असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वास्तुतील अंतर्गत रचना आणि भाषिक संग्रहालयाच्या निर्मितीसाठी तत्कालीन मराठी भाषा मंत्री यांचे अध्यक्षतेखाली ३ वेगवेगळया विभागांसाठी तज्ञांची समिती नेमण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-०२-२०२३) :** (१) व (२) होय. गिरगांव महसूली विभागातील भूखंड क्र. १७३६, चर्नी मार्ग, मुंबई येथे मराठी भाषा भवन, मुख्य केंद्र व भूखंड क्र.६-ए, सेक्टर १३, ऐरोली येथे मराठी भाषा भवन, उपकेंद्र या इमारतींचे बांधकाम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मराठी भाषा भवन, मुख्य केंद्र, चर्नी मार्ग या इमारतीच्या प्रकल्पखर्चाकरिता रु.१२६.८९ कोटी इतकी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर इमारतीतील चार मजल्यांवर मराठी भाषेच्या कालखंडनिहाय समृद्धतेचे दर्शन घडविणारी दालने (उदा. प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन इ.), तसेच या इमारतीमध्ये २०० आसन क्षमतेचे बहुउद्देशीय सभागृह, १४५ प्रेक्षकांची क्षमता असलेले ॲम्फी थिएटर व प्रशासकीय व कार्यालयीन कामकाजासाठी जागा इ. सह अन्य सोईसुविधांचा समावेश प्रस्तावित होता.

(३) होय. मराठी भाषा भवन, मुख्य केंद्र या इमारती अंतर्गत मराठी भाषेची अभिजातता व कालखंडनिहाय समृद्धतेची ओळख करुन देणारे भाषिक व वस्तू संग्रहालय निर्माण करण्याबाबतचा निर्णय दि.२१.०४.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला. सदर शासननिर्णयान्वये या प्रस्तावित भाषिक व वस्तू संग्रहालयामध्ये कोणते ग्रंथ/ दस्ताऐवज, पुरावे इ. ठेवता येतील यासाठी शासनाला मार्गदर्शन करण्याकरिता एकूण १४ शासकीय व अशासकीय सदस्यांचा समावेश असलेली समिती मा.मंत्री, मराठी भाषा यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली.

(४) व (५) मा. मंत्री, मराठी भाषा यांनी दि.२५.०१.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत मराठी भाषा भवन, मुख्य केंद्राच्या अंतर्गत आराखड्यांमध्ये सुधारणा सुचविल्या आहेत. तसेच मराठी भाषा भवन व जवाहर बालभवन या दोन्ही इमारतींचा

एकत्रित विकास करता येईल याबाबत विचार करुन त्यानुसार आराखडे सुधारीत करण्याबाबत संबंधित वास्तूविशारद व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना सूचना दिल्या आहेत.

---

## मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीतील इमारतींच्या दुरुस्तीबाबत

**(३५) ४९९०७ (१८-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीतील जीर्ण झालेल्या व धोकादायक स्थितीत असलेल्या इमारतींचा प्रश्न मार्गी लावण्यासंदर्भात मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिनांक २६ ऑगष्ट, २०२२ रोजी वा त्या सुमारास सर्वसबंधितांसमवेत आढावा बैठक घेऊन निर्देश दिलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच धोकादायक स्थितीत असलेल्या शासकीय वसाहतीतील इमारतींच्या पुनर्बांधणीसंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीतील जीर्ण झालेल्या व धोकादायक स्थितीत असलेल्या इमारतींचा प्रश्न मार्गी लावण्यासंदर्भात दिनांक २६ ऑगष्ट, २०२२ रोजी सर्व सबंधितांसमवेत आढावा बैठक घेण्यात आली होती

(२) व (३) सदर वसाहतीतील ३०२ इमारतींचे संरचनात्मक परिक्षण पुर्ण झाले आहे. इमारतींचे आयुर्मान व सद्यस्थिती विचारात घेऊन दि.२९.०८.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये २१३० निवासस्थाने (वर्ग- ३ व वर्ग-४ ची २०१२ व वर्ग-२ व वर्ग-२ ची ११८) बांधण्याच्या प्रस्तावास रु.२९६.१२ कोटी रकमेस मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. सद्यस्थितीत वर्ग-३ व वर्ग-४ करीता २०१२ सदनिकांकरीता १२ इमारतींचे बांधकाम प्रगतीपथावर असून या सदनिका टप्प्याटप्याने उपलब्ध होणार आहेत. सदर भुखंडाचा प्रचलित विकास नियमावलीनुसार विकास करणेबाबत निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे.

---

## मुंबईतील कलिना परिसरामध्ये भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय व संग्रहालय स्थापन करण्याबाबत

**(३६) ४९९०८ (१८-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कलिना परिसरामध्ये दिवंगत गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या सन्मानार्थ भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय आणि भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर संग्रहालय स्थापन करण्याचा दिनांक ०८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निर्णय घेण्यात आला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१०-०२-२०२३) :** (१) मुंबईतील कलिना परिसरामध्ये दिवंगत गानसम्राज्ञी यांच्या सन्मानार्थ भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतराष्ट्रीय संगीत महाविद्यालय आणि भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर संग्रहालय स्थापन करण्याचा शासन निर्णय दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) संगीताचा शास्त्रशुध्द अभ्यास, विकास, प्रसार आणि प्रचार करण्यासाठी भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतराष्ट्रीय संगीत महाविद्यालय स्थापन करण्याचा तसेच सदर महाविद्यालयांतर्गत भारतीय लोकसंगीत, शास्त्रीय संगीत, संगीत वाद्ये आणि भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर यांच्या जीवनावर आधारित माहिती, वस्तू यांचा समावेश असलेले भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर संग्रहालय स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

तसेच, दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये सदर महाविद्यालयामध्ये हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत, भारतीय बासरी वादन, तबला वादन, सतार वादन, हार्मोनियम/कीबोर्ड वादन व संगीत निर्मिती/ध्वनी अभियांत्रिकी असे ६ प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तात्पुरत्या स्वरुपात सदर महाविद्यालय दिनांक २ जानेवारी, २०२३ पासून पु. ल. देशपाडे अकाaदमी, प्रभादेवी, मुंबई येथे सुरु करण्यात आले असून त्यामध्ये ४७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय व संग्रहालयाची इमारत बांधण्यासाठी कलिना संकुल, मुंबई येथील ग्रंथालय संचालनालयाची जागा कला संचालनालयास हस्तांतरित करण्याबाबतची कार्यवाही महसूल व वन विभागाद्वारे करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील रस्त्यांच्या कामांना शासनाने स्थगिती दिल्याबाबत

**(३७) ५००८२ (१८-०१-२०२३). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुमारे ४५० कोटी रुपयाच्या कामांना शासनाने दिनांक २२/०९/२०२२ रोजी वा त्यासुमारास स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांना स्थगिती देण्याची कारणे काय आहेत तसेच रुपये ४५० कोटीच्या कामात कोणकोणत्या बाबीचा समावेश करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उक्त कामांना दिलेली स्थगिती उठवून ही कामे पूर्ववत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०२-२०२३) :** (१) व (२) मुख्य सचिव यांचेमार्फत प्राप्त झालेल्या मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निदेशानुसार सा.बां.विभागाने शासन पत्र क्र. आरएमआर २०२२/प्र.क्र.१२४/रस्ते-१,दि.२३/०७/२०२२ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्ते उपक्षेत्रांतर्गत अर्थसंकल्पित असलेल्या राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, समुद्र धूप प्रतिबंधक बंधारे, रेल्वे उड्डाणपूल व इमारती उपक्षेत्रांतर्गत निरीक्षण बंगले, विश्रामगृहे, शासकीय कार्यालयीन व निवासी इमारती घटकांतर्गत तसेच रस्ते परिरक्षण दुरुस्ती मधील विशेष दुरुस्ती व पूरहानी दुरुस्तीची दि.०१.०४.२०२१ पासून ज्या कामांच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत, मात्र कार्यादेश दिलेले नाहीत किंवा कार्यादेश देऊनही कामे सुरु झाली नाहीत अशा कामांना शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात आली.

(३) सा.बां.विभागाने दि.२३/०७/२०२२ च्या पत्रान्वये स्थगित केलेल्या कामांचे पुनर्विलोकन करुन नविन इमारती बांधणे, इमारतीची देखभाल व दुरुस्तीची कामे, धुपप्रतीबंधक बंधारे, घाट रस्ते, नविन पुल व पुलांची दुरुस्ती, रेल्वे उड्डाणपूल तसेच काही रस्त्यांचे डांबरीकरण व मजबुतीकरण व दुरुस्तीची कामे या वरील स्थगिती उठविण्यात आली आहे.

स्थगित केलेल्या उर्वरित कामांचे पुनर्विलोकन करुन यथायोग्य निर्णय घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे ते सातारा महामार्गावरील खेड-शिवापूर सेथील टोल नाका (ता.हवेली) हटविण्याबाबत**

**(३८) ५०१२० (१८-०१-२०२३). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे ते सातारा महामार्गावरील खेड-शिवापूर टोल नाका (ता.हवेली) पीएमआरडीए हद्दीबाहेर हटविण्याची मागणी सन २०१९ मध्ये स्थापन केलेल्या शिवापूर टोलनाका हटाव कृती समितीने वारंवार संबंधितांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर टोल नाका हटविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०१-२०२३) :** (१) होय.

(२) पुणे ते सातारा राष्ट्रीय महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व उदयोजक यांच्यात झालेल्या दि.१०.०३.२०१० रोजीच्या करारनुसार खेड शिवापूर (कि.मी.८१९/२४०) व आणेवाडी (कि.मी.७४८/६००) या ठिकाणी पथकर नाका निश्चित करण्यात आलेला आहे.

राष्ट्रीय महामार्ग अधिसूचना दि.०५.१२.२००८ व दि. २६.०८.२०१० च्या अधिन राहून वरील दोनही पथकर नाक्यावर पथकर आकारणी केली जाते.

पथकर नाका स्थलांतर करण्याचे अधिकार केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहेत. तसेच पथकर नाक्याची ठिकाण बदलल्यानंतर पथकर वसुलीवर परिणाम होवू शकतो व त्यासाठी उदयोजक नुकसान भरपाई म्हणून अतिरिक्त रक्कमेची मागणी करेल. त्यामुळे पथकर नाका स्थलांतर करणे शक्य नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील रस्ते दुरुस्ती विकास कामांवरील स्थगिती उठविण्याबाबत**

**(३९) ५०५२० (१८-०१-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील रस्त्यांचे रुंदीकरण व मजबुतीकरण करण्याच्या कामासाठी माहे मार्च, २०२२ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आलेल्या कामांना शासनाने स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्नर येथील शिवनेरी गडावर राज्यातून व देशभरातून शिवप्रेमी मोठया प्रमाणात येत असून वाहतुकीची गैरसोय होत असल्यामुळे जुन्नर तालुक्यातील रस्त्यांचे रुंदीकरण व मजबुतीकरणाच्या कामांना दिलेली स्थगिती उठविण्यात यावी अशी विनंती संबंधित लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांना दि. ०२/११/२०२२ रोजी पत्राद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

सा.बां.विभागाने शासन पत्र क्र. आरएमआर २०२२/प्र.क्र.१२४/रस्ते-१, दि.२३/०७/२०२२ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्ते उपक्षेत्रांतर्गत अर्थसंकल्पित असलेल्या राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, समुद्र धूप प्रतिबंधक बंधारे, रेल्वे उड्डाणपूल व इमारती उपक्षेत्रांतर्गत निरीक्षण बंगले, विश्रामगृहे, शासकीय कार्यालयीन व निवासी इमारती घटकांतर्गत तसेच रस्ते परिरक्षण दुरुस्ती मधील विशेष दुरुस्ती व पूरहानी दुरुस्तीची दि.०१.०४.२०२१

पासून ज्या कामांच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत, मात्र कार्यादेश दिलेले नाहीत किंवा कार्यादेश देऊनही कामे सुरु झाली नाहीत अशा कामांना शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सा.बां.विभागाने दि.२३/०७/२०२२ च्या पत्रान्वये स्थगित केलेल्या कामांचे पुनर्विलोकन करुन नविन इमारती बांधणे, इमारतीची देखभाल व दुरुस्तीची कामे, धुपप्रतीबंधक बंधारे, घाट रस्ते, नविन पुल व पुलांची दुरुस्ती, रेल्वे उड्डाणपूल तसेच काही रस्त्यांचे डांबरीकरण व मजबुतीकरण व दुरुस्तीची कामे या वरील स्थगिती उठविण्यात आली आहे.

स्थगित केलेल्या उर्वरित कामांचे पुनर्विलोकन करुन यथायोग्य निर्णय घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पोषण आहाराचे अनुदान नियमित मिळण्यासाठी ऑनलाइन नोंदी करण्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(४०) ५१५१२ (१८-०१-२०२३). श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोषण आहाराचे अनुदान नियमित मिळण्यासाठी ऑनलाइन नोंदी करण्याचे काम माहे मार्च, २०२१ पासून प्रलंबित असून शिक्षण संचालनालयाने या नोंदीमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी बॅक डेटेड नोंदी करण्याची सोय उपलब्ध करुन दिली असतानाही ६५० शाळांनी या नोंदीला प्रतिसाद दिला नसल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व शाळांना अनुदानापासून वंचित राहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ऑनलाइन नोंदी न करणाऱ्या शाळांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१३-०२-२०२३) :** (१) अंशत : खरे आहे.

(२) व (३) प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरुन सर्व शाळांना पटसंख्येच्या आधारे ७० टक्के अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. उर्वरित ३० टक्के अनुदान शाळांनी भरलेल्या ऑनलाईन माहितीची पडताळणी करुन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बल्लापूर ( जि.चंद्रपूर) नगरपरिषद संचालित सरदार पटेल प्राथमिक शाळेच्या पोषण आहारात अळी सापडल्याबाबत

**(४१) ५१५६१ (१८-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बल्लारपूर (जि.चंद्रपूर) नगरपरिषद संचालित सरदार पटेल प्राथमिक शाळेत पोषण आहारात अळी सापडल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट दर्जाचा पोषण आहार पुरवठा करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१३-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) संबंधित संस्थेविरुध्द रु.२५,०००/- इतक्या रकमेची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत सर्व दुरुस्ती कामांस दिलेल्या स्थगितीबाबत**

**(४२) ५१६२९ (१८-०१-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत रस्ते, पूल, इमारती, रस्ते परिरक्षण, व विशेष दुरुस्ती त्याच प्रमाणे पूरहानी दुरुस्तीच्या दि. ०१/०४/२०२१ पासून निविदा मागविण्यात आल्या परंतु अद्याप कामे सुरु झाले नाहीत अशा कामांना शासनाने दि. २३/०७/२०२२ रोजी स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात अतिवृष्टीमुळे रस्ते, पूल, इमारती यांची मोठ्या प्रमाणावर हानी झाल्याने नागरीकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागरीकांना होणारा त्रास व गैरसोय लक्षात घेता सदरची स्थगिती तात्काळ उठविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त स्थगिती तात्काळ उठविण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सा.बां.विभागाने दि.२३/०७/२०२२ च्या पत्रान्वये स्थगित केलेल्या कामांचे पुनर्विलोकन करुन नविन इमारती बांधणे, इमारतीची देखभाल व दुरुस्तीची कामे, धुपप्रतीबंधक बंधारे, घाट रस्ते, नविन पुल व पुलांची दुरुस्ती, रेल्वे उड्डाणपूल तसेच काही रस्त्यांचे डांबरीकरण व मजबुतीकरण व दुरुस्तीची कामे या वरील स्थगिती उठविण्यात आली आहे.
स्थगित केलेल्या उर्वरित कामांचे पुनर्विलोकन करुन यथायोग्य निर्णय घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली येथील सहायक वीज अभिंयत्याने आत्महत्या केल्याबाबत**

**(४३) ५२७४३ (१८-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली येथील जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या मागच्या भागात बांधकाम विभागातंर्गत विद्युत विभागाचे कार्यालयात श्री.केशव आखाडे या सहायक अभियंत्याने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाशीम जिल्हयातील सिलोड येथील रहिवासी असलेला श्री.केशव आखाडे हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परिक्षा पास करून गडचिरोली येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्युत विभागात गत चार महिन्यापुर्वीच रूजू झाला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०२-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) प्रस्तुत प्रकरणी पोलीस स्टेशन, गडचिरोली यांचेमार्फत पुढील चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासन मान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या मागण्यांबाबत**

**(४४) ५२८५७ (१८-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या शासनाकडून देय असलेले परीरक्षण अनुदानात गत दहा वर्षापासून वाढ झालेली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुदान वाढीची फाईल वित्त विभागाकडे सादर केलेली असुन अद्याप ही त्यास मान्यता मिळालेली नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रंथालय अनुदान वाढ करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रंथालय भारती नागपूर, यांनी लेखी निवेदनाव्दारे मा. उपमुख्यमंत्री आणि मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना जुलै २०२२ मध्ये वा त्या दरम्यान केली हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०६-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या मागण्यांबाबत श्रीमती श्वेता महाले, मा. विधानसभा सदस्य (चिखली) आणि ग्रंथालय भारती, नागपूर यांची दि.२२.०८.२०२२ रोजीची निवेदने प्राप्त झाली आहेत.
(४) मा. मंत्रीमंडळाच्या दि.१३.१२.२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या विद्यमान परिरक्षण अनुदान दरात सन २०२२-२३ पासून ६० % वाढ करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. यानुषंगाने शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.मराग्रं-२०२२/प्र.क्र.२१/साशि-५,दि.२१.१२.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आधारभुत धान खरेदी योजने अंतर्गत साठवण कालावधीनुसार गोदाम भाडे मिळणेबाबत**

**(४५) ५३२९४ (१८-०१-२०२३). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत धान खरेदी करणाऱ्या संस्थांना हंगाम २०१४-१५ पर्यंत जेवढ्या कालावधीसाठी गोदामामध्ये धान्य साठवून ठेवण्यात येत होते तेवढ्या कालावधीचे गोदाम भाडे शासनाकडून देण्यात येत होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१५-१६ च्या हंगामापासून सदर धोरण बदलवून गोदाम मालकांना केवळ २ किंवा ४ महिन्यांच्या कालावधीचे गोदाम भाडे देण्याचे निश्चित केले असल्याने २ किंवा ४ महिन्यापेक्षा अधिक कालावधीत धान्य गोदामामध्ये राहिल्यास वाढीव कालावधीचे भाडे शासनाकडून देण्यात येणार आहे काय,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

उक्त योजना ही १००% केंद्र पुरस्कृत योजना आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या दराने (Cost Sheet) व कालावधीच्या मर्यादेतच गोदाम भाडे अदा केले जात आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### येवला (जि.नाशिक) तालुक्यातील रस्त्याच्या कामाची स्थगिती उठविण्याबाबत

**(४६) ५३४४१ (१८-०१-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील अर्थसंकल्प २०२२ मधील रस्त्याच्या कामांची स्थगिती उठविण्यात येवून हे काम सुरु करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने दि. २३ जुलै, २०२२ च्या पत्रान्वये स्थगिती दिलेल्या कामांवरील स्थगिती उठविण्याकरिता लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाला निवेदन देवूनही शासनाने दि. १४/१०/२०२२ च्या पत्रान्वये ठराविक कामांवरीलच स्थगिती उठवली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील रस्त्यांवरील कामांची स्थगिती उठवून सदर कामे सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सा.बां.विभागाने दि.२३/०७/२०२२ च्या पत्रान्वये स्थगित केलेल्या कामांचे पुनर्विलोकन करुन नविन इमारती बांधणे, इमारतीची देखभाल व दुरुस्तीची कामे, धुपप्रतीबंधक बंधारे, घाट रस्ते, नविन पुल व पुलांची दुरुस्ती, रेल्वे उड्डाणपूल तसेच काही रस्त्यांचे डांबरीकरण व मजबुतीकरण व दुरुस्तीची कामे या वरील स्थगिती उठविण्यात आली आहे.
स्थगित केलेल्या उर्वरित कामांचे पुनर्विलोकन करुन यथायोग्य निर्णय घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खेड (जि.पुणे) तालुक्यातील आदिवासी शाळांमध्ये पुरविण्यात येणाऱ्या पोषण आहाराबाबत

**(४७) ५३७०८ (१८-०१-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पोषण आहारातून मुलांना चांगला आहार मिळावा तसेच शाळेत येण्याविषयी गोडी वाढावी या उदात्त हेतूने महाराष्ट्र सेवा योजना यामध्ये एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत शाळांना पोषण आहार म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याला १५४ दिवसांचे तांदूळ, मुगाची डाळ व हरभरा यांचे वितरण करण्यात येत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खेड (जि.पुणे) तालुक्यातील पश्चिम आदिवासी शाळांमध्ये पोषण आहार पुरवठा करण्यात येणाऱ्या गाड्यांमध्ये वजन काटा नसल्याने प्रत्येक शाळेत वजन न करताच धान्यपुरवठा सुरु असल्याने गाडीत मोठ्या प्रमाणात धान्य अस्ताव्यस्तपणे पडलेले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१३-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
केंद्र शासनाच्या निर्देशानुसार कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत माहे ऑगस्ट - २०२१ ते फेब्रुवारी- २०२२ या कालावधीतील १५४ दिवसांचा अनुज्ञेय कोरडा शिधा विद्यार्थ्यांना देण्यात आला आहे.

(२)  हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठ व्यवस्थापन तथा शासकीय विधी महाविद्यालयाच्या तृतीय वर्षीय विधी अभ्यासक्रमाच्या निकालाबाबत

**(४८) ५४४४१ (१८-०१-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठ व्यवस्थापन तथा शासकीय विधी महाविद्यालयाने तृतीय वर्षीय विधी अभ्यासक्रमाच्या दिनांक ०९ जून,२०२२ रोजी वा त्या सुमारास अंतिम सत्राची परिक्षा घेतली असून दिनांक १३ ऑगस्ट,२०२२ रोजी वा त्या सुमारास जाहिर केलेल्या निकालपत्रात श्री.अभिषेक मिश्रा, श्री.सर्वेश पाटील यांच्यासह आठ विद्यार्थ्यांची नावे नसल्याचे दिनांक १५ सप्टेंबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विद्यापीठ व महाविद्यालय व्यवस्थापनाकडून गुणपत्रिका व विधी पदवी अद्याप न मिळाल्याने पुढील एलएलएम प्रवेश अभ्यासक्रम आणि वकिली व्यवसाय सुरु करता येत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०६-०२-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
श्री.अभिषेक मिश्रा, श्री.सर्वेश पाटील आणि इतर आठ विद्यार्थ्यांचा निकाल तांत्रिक कारणांमुळे राखीव ठेवण्यात आला होता. सदर बाब महाविद्यालयाच्या लक्षात आल्यानंतर महाविद्यालयाने संबंधित कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर श्री.अभिषेक मिश्रा, श्री.सर्वेश पाटील यांच्यासह आठ विद्यार्थ्यांचा निकाल दि. १७ सप्टेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे व संबंधित महाविद्यालयाला गुणपत्रिका देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर शहरातील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाच्या पदवी व पदयुत्तर अभ्यासक्रमाच्या निकालाबाबत

**(४९) ५५१८३ (१८-०१-२०२३). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाच्या पदवी व पदयुत्तर अभ्यासक्रमाचा निकाल जाहीर झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या पेपर तपासणीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करत कमी गुण मिळाल्याच्या तक्रारी दाखल करुन यासंदर्भात विद्यार्थी संघटनांनी आंदोलन केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत पदवी व पदुत्तर अभ्यासक्रमाच्या परिक्षेबाबत तसेच सदर निकाल कधीपर्यंत अपेक्षित आहे व पेपर तपासणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०६-०२-२०२३) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद सोलापूर यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ येथे दिनांक १३.१०.२०२२ रोजी झालेल्या चर्चेअंती मार्च/ एप्रिल २०२२ मधील परीक्षा दिलेल्या सर्व

अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विद्यापीठ अध्यादेश १०६ (ब) मधील तरतुदींनुसार निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर बाब विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना विद्यापीठाकडून परिपत्रकाद्वारे कळविण्यात आलेली आहे. त्यानुसार उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी उपलब्ध करून देण्याबाबत तसेच उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करणेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केलेला होता त्यांच्या अर्जावर विद्यापीठ नियमानुसार कार्यवाही करून वेळेत अर्ज निकाली काढण्यात आलेले आहेत. तसेच पुनर्मूल्यांकनाचे सर्व निकाल प्रसिद्ध करण्यात आलेले असून विद्यपीठाकडे एकही अर्ज प्रलंबित नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर शहर व जिल्ह्यात धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(५०) ५५१८४ (१८-०१-२०२३). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील रामवाडी गोडावून येथील शासनाच्या धान्याचा काळा बाजार करण्यात येत असल्याने यासाठी सक्षम अधिकाऱ्यांची समिती नेमून नि:पक्षपाती चौकशी करुन धान्याचा काळा बाजार करण्याऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन न्यास, सोलापूर शाखेने केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत मा.जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, शहरात धान्य दुकानांची संख्या किती व लाभार्थ्यांची संख्या किती आहे, त्यांना दरमहा शासनाकडून किती धान्य पुरवठा करण्यात आला आहे तसेच पुरवठा अधिकाऱ्यांकडून किती धान्य वितरीत करण्यात आले आहे,
(४) असल्यास, संबंधीत पुरवठा विभागाकडे प्राप्त होणारे धान्य व वितरीत केलेले धान्य याची तपशीलवार माहीती ठेवण्यात आली आहे काय व सद्य:स्थितीत धान्याचा शिल्लक साठा किती आहे,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने धान्याचा काळाबाजार करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०८-०२-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर यांचे कार्यालयाच्या अंतर्गत रास्त भाव दुकानांची एकूण संख्या ३१४ इतकी आहे. अंत्योदय योजनेच्या शिक्षापत्रिका संख्या ६१४६ असून त्यावरील लोकसंख्या २४६७६ आहे. प्राधान्य कुटुंब लाभार्थी एकूण शिक्षापत्रिका संख्या ११०२३६ असुन त्यावरील लोकसंख्या ४८९५९३

नियमित (NFSA) योजनेचे अंत्योदय शिधापत्रिकाधारकांसाठी गहू ९४ मे.टन व तांदुळ १२७ मे.टन व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यासाठी गहु १०१८ मे.टन व तांदुळ १५२७ मे.टन व प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत (PMGKAY) अंत्योदय योजनेचे गहू ५१ मे.टन व तांदुळ ७६ मे.टन व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यासाठी गहू ५०९ मे.टन व तांदुळ २०३५ मे.टन इतके मंजूर करणेत आले आहे.

नियमित (NFSA) अंत्योदय शिधापत्रिकाधारकांसाठी गहू ९१.४५ मे.टन व तांदुळ १२१.९० मे.टन व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यासाठी गहू ९९१.९५ मे.टन व तांदुळ १४८७.९५ मे.टन व प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत (PMGKAY) अंत्योदय शिधापत्रिकासाठी गहू ४९.१५ मे.टन व तांदूळ ७३.६५ मे.टन प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यासाठी गहू ४९६.५० मे.टन व तांदुळ १९८५.७० मे.टन धान्य नियतन वितरीत करण्यात आले आहे.
(४) शासनाकडील प्राप्त धान्याचे नियतन (NFSA AND PMGKAY) व अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर यांचेकडून वितरीत केलेल्या धान्याच्या नियतनाची माहिती तपशिलवार ठेवण्यात आली असून सोलापूर शहरामध्ये थेट वाहतूक असलेने गोदामात धान्य साठा शिल्लक नाही.

(५) भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास, सोलापूर यांच्या प्रकरणी परिमंडळ अधिकारी, ब व ड यांच्यामार्फत चौकशी केली असता, सोलापूर शहरामध्ये थेट वाहतूक असलेने सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत धान्याचा काळाबाजार होत असलेचे आढळून आलेले नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.